# <u>अधिसूचना -कलम ११</u>

**उपविभागीय अधिकारी फलटण**
**उपविभाग फलटण यांचे कार्यालय**
**फलटण दि.०२/११/२०१७**

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ .**

एस. आर. क्रमांक २८१/२०१७ ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय, अधिसूचना , महसूल व वन विभाग क्र./ संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ , दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूंचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड ऐ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, जिल्हाधिकारी सातारा यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे , असे वाटते , ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे , आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की , उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत)

आणि ज्याअर्थी , सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे

आणि ज्याअर्थी , कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशिल नमुद करावा)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती , ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

Scanned by CamScanner

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार , जिल्हाधिकारी भुसंपादन , पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम , २०१४ (यात यापूढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी , उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी फलटण, उपविभाग फलटण यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

**संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गाव बोडकेवाडी** **तालुका - फलटण** **जिल्हा - सातारा**

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | एकुण संपादन क्षेत्र | लागणीलायक व पोटखराबा सह संपादन क्षेत्र | दिशा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २५३ | १.२२ | १.२२ | २५३ | - | २५४ | २२५ |
| | | पोख | ०.०० | | | | |

## अनुसूची - दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | |
|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | धोमबलकवडी प्रकल्प |
| **प्रकल्प कार्याचे वर्णन** | धोम बलकवडी प्रकल्प- धोम बलकवडी उजवा कालवा १ ते १४७ व धोम बलकवडी डावा कालवा १ ते १४.५० भूसंपादन प्रस्ताव |
| **समाजाला मिळणारे लाभ** | **अ)** या प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रामध्ये आठ माही पाण्याची सोय होणार असलेने लोकांचा आर्थीक व सामाजिक स्थर उंचावून विकासदर वाढणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे लाभक्षेत्रातील पाणीटंचाई दुर होणार आहे. |
| | **ब)** प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पिक क्षेत्रामध्ये वाढ होणार असलेने स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच कालव्यामुळे भूगर्भातील जलस्थर वाढण्यास मदत होणार आहे. |

## अनुसूची - तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

संपादन करणेत येणा-या क्षेत्रामध्ये जमीन येत असल्यामुळे गावठाण विस्थापित होत नाही. बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

Scanned by CamScanner

## अनुसूची - चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

सदरचा प्रकल्प ग्रामीण पायाभूत सुविधांतर्गत येत असल्याने त्यास भूसंपादन अधिनियम २०१३ आणि महाराष्ट्र शासनाच्या दि.१३/३/२०१५ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रानुसार, सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची - पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम - कार्यकारी अभियंता,

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता - धोम बलकवडी प्रकल्प विभाग वाई.

क. ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशिल- प्रश्न उदभवत नाही

**टिप - उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग फलटण यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.**

**(संतोष जाधव)**
**उपविभागीय अधिकारी**
**फलटण उपविभाग फलटण तथा**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन**
**फलटण**

**दिनांक :** ०२/११/२०१७
**ठिकाण :** **फलटण**

Scanned by CamScanner